आयुक्त अपंग कल्याण
आयुक्त कार्यालय
आवक क्र. २८  दिनांक १५ MAR 2004

**स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा व्यवस्थापनेसाठी प्रशासक नेमणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

सामाजिकन्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
**शासन निर्णय क्रमांक:-** इडीडी-२००४/प्र.क्र.३/सुधार-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक:-** ९ मार्च,२००४

वाचा:- १) अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा संहिता १९९७
२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्रशासक नि/ अपंग संस्था/ प्र-७/२००३-०४/२२९३, दिनांक १५/१०/२००३

**प्रस्तावना :-** अपंग व्यक्ती (समान संधी,हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ नुसार अनुज्ञप्ती प्राप्त असणा-या स्वंयसेवी संस्थांमार्फत अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत. अशा शाळांचे कामकाज अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांकरिता सुधारित शाळा/कार्यशाळा संहिता १९९७ प्रमाणे चालविले जात आहे. परंतू अशा विशेष शाळा/कार्यशाळा चालविणा-या पंजीकृत संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये मतभेद व वाद निर्माण होतात. त्यामुळे त्यांचे व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष होते. परिणामी शाळांमधील मान्यतेचे प्रस्ताव पाठविणे, कर्मचा-यांचे वेतन देयके सादर करणे, त्यांना शास्ती लागू करणे, विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यामध्ये अडचणी निर्माण होणे इत्यादी बाबी मध्ये अडचणी उद्‌भवतात. अशावेळी संबंधित संस्थेच्या व्यवस्थापना विरुध्द कोणती कारवाई करावी, याबाबत अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा १९९७ मध्ये तरतूद नाही.

२. अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळामधील विद्यार्थ्यांना निकषाप्रमाणे संस्था सर्व सोई सुविधा उपलब्ध करुन देत नसल्यास अशा संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणे अथवा त्यांचे नुतनिकरण न करणे या याबाबत अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येते. परंतू अशी कार्यवाही केल्याने मुख्यत: अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व कर्मचा-यांच्या सेवेचा प्रश्न न सुटता तो अधिक तीव्र व गुंतागुंतीचा होतो. तेव्हा अशा अडचणी उद्‌भवू नये याकरिता संबंधित स्वंयसेवी संस्थांच्या व्यवस्थापनामधील मंडळामध्ये मतभेदामुळे गैरव्यवस्था निर्माण झाल्यास त्याचा विपरित परिणाम अपंग विद्यार्थी व कर्मचा-यावर होत असल्यास स्वंयसेवी संस्थेच्या व्यवस्थापनातील वाद/मतभेद तसेच अपंग विद्यार्थ्यास सोई सुविधा पुरविण्यास व्यवस्थापन सक्षम असल्याची खात्री होईपर्यंत अशा संस्थेचे व्यवस्थापन ताब्यात घेऊन त्या शाळेवर शासनामार्फत प्रशासक नियुक्त करण्याची तरतूद असणे

कृ.मा.प.

अनिवार्य आहे. परंतू अशी तरतूद अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा संहिता १९९७ मध्ये करण्यात आलेली नाही. याकरिता अशी तरतूद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u> अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा संहिता १९९७ मधील प्रकरण - दोन, शालेय व्यवस्थापनाचे स्वरुप भाग-१, नियम क्र.४३-अ मध्ये संस्थेचे शालेय व्यवस्थापन ताब्यात घेण्याचा हक्क राखून ठेवणे या शिर्षाखाली शाळा/कार्यशाळामध्ये गैरव्यवस्थापन, स्वयंसेवी संस्थेमधील मंडळीतील मतभेदामुळे शाळा/कार्यशाळेचे गैरव्यवस्थापन निर्माण झाल्यास किंवा व्यवस्थापन शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करित असल्याने शाळा/कार्यशाळेचे दैनंदिन कामकाज चालविणे कठीण होत असल्यास किंवा शाळा/कार्यशाळेकडे दुर्लक्ष होत असल्यास अशा शाळा/कार्यशाळा चालविणा-या संस्थेचे व्यवस्थापन, नियंत्रण व प्रशासन ताब्यात घेण्याचा व अशा शाळा/कार्यशाळेचर कामकाजात सुधारणा होईपर्यंत आणि व्यवस्थापनातील मतभेद संपेपर्यंत प्रशासक नियुक्त करण्याचा अधिकार शासनास राहील. हे अधिकार महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (व्यवस्थापन) अधिनियम,१९७६ (१९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१३) मधील तरतूदीप्रमाणे राहील, असा शासनाने निर्णय घेतला आहे.

वरील प्रमाणे एखादया स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणा-या अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा व्यवस्थापनामध्ये अडचणी निर्माण झाल्यास तेथे प्रशासक नेमण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी योग्य त्या समर्थनासह शासनास सादर करावा.तसेच हा शासन निर्णय सर्व संबंधित स्वयंसेवी संस्थांच्या निदर्शनास आणावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वै. पारकर

(वै. अ. पारकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई.
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा
सर्व समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव.
निवडनस्ती, सुधार-२